॥ श्री ॥

# श्रीदत्तस्वरुष सप्ताह पारायण बाळानंद चरित्र




प्रकाशक-
रघुनाथ बुवा दत्तमंदीर
चाळीसगांव

श्री. भगवंतराव एकबोटे

लेखक-
वेदमूर्ती चिष्णू बाळकृष्ण
जोशी कन्नड

# साक्षात्कार कथा

Scanned with CamScanner




Scanned with CamScanner

# आत्मनिवेदन



ह. भ. प. श्री. रघुनाथ बुवा.

ॐश्रीदत्तगुरू नाथस्वरूपी श्रीबालानंद महाराज गिरडगांव ( दूधगांव ) यांना दैवी उपासनेचे साक्षात्कार श्रीदत्त रेणुका क्षेत्र माहूर येथें होऊन त्यांनी सनातन हिंदु धर्मरक्षण प्रसारार्थ भागवत वारकरी भक्तिमार्ग सदाचार स्वधर्म जनता कल्याणार्थ माहूर पंढरपूर भागांत संतमंडळीसह कर्मयोग भक्तियोग जागृती अपूर्वतेनें केली. त्यांची समाधी व श्रीदत्त प्रसादमूर्ती दूधगांव गिरणातटीं आहे. तेथें श्रीउपासना सुरूं आहे. त्या श्रीदत्तभक्ति परंपरेत योगायोगानें आम्हाला श्रीदत्तमंदीर ( श्री. पाटसकर ) चाळीसगांव येथें दत्तसेवायोग आला. श्रीबालानंद गुरुनाथ यांचे पांच अध्यायांचे ओंवीचरित्र श्रीविष्णुदास संतकवी माहूर यांनी शके १८१४ चे सुमारास लिहिले. त्यानंतर शके १८७६ ला पंडित विष्णु बा. जोशी कन्नडकर यांनी पुढें २ अध्याय लिहून मंत्र अक्षरबंध भक्ति काव्यात्मक सप्ताह पारायण योजना पूर्ण केली.

त्या प्रासादिक संत बालानंद चरित्राच्या प्रकाशनास श्री. ह. वि. पाटसकर कायदे मंत्री हिंदराज्य यांचे कडून कांही सहाय्य झाले व कांही सहाय्य बालानंद गुरुभक्त परंपरेतील वऱ्हाडमधील ता. अकोटचे श्री. दत्तुलाल

व पुसदचे श्री. पाटीलपांडे हिवरेकर तसेच कन्नडचे वेदमूर्ती श्री. दादागुरू यांचेकडून मिळाले असल्यानें हा संतचरित्र ग्रंथ प्रकाशनाचा योग आलेला आहे. या संतवाङमय जनता हितकार्यकर्ते श्री. पाटसकर महाशय व परंपरा धर्मस्वाभिमानी उदार प्रेमी भक्तमंडळीचे आभार, अभिनंदन व कल्याण श्रीदत्तप्रसाद प्रकाश चिंतून ही श्रीदत्तगुरू सेवा जनताजनार्दन चरणीं निवेदन करीत आहे.

माघ शु ।। १० बुधवार
शके १८७६

संत चरणभक्त,
रघुनाथ बुवा
पाटसकर दत्तमंदीर चाळीसगांव

Scanned with CamScanner

# ।। श्रीबालानंद चरित्र – प्रथमोध्यायः ।।



अर्जुना तयावरी । व्दैताची सरली वारी ।
नांदो नामार्थ एकाहारी । मी तूं वीण ।। १४-५६

कर्मी हा ठावोवरी । आहाती बहुधा अवसरी ।
आतां कर्मठां कैं वारी । मोक्षाची हे ।। १८-६८

काया वाचा मनें सर्वस्वी उदार । बाप रूखमा देवीवर ।
विठ्ठलाचा वारीकर । – अभंग।।.....................संत ज्ञानेश्वर

संत भागवत हरिभक्त । राष्ट्र देव वाङमय धर्म आसक्त ।
कर्म योगी स्वार्थ त्यागी विरक्त । ते विधि विष्णु शिव दत्तरूप ।। विष्णु

मीं तो भक्त रूप । भक्त माझें स्वरूप ।
प्रभा आणि दीप । जयां परी ।।............नाथ

श्रीमद्रणेशांबा गुरूनाथ रेणुकांबा ब्रह्मा विष्णु शिव सिध्देभ्यो नमोनमः।
श्री दत्तगुरू स्वरूप योगी बालानंद गुरू – चरित्र ग्रंथः प्रारम्यते ।।

श्रीगजवदना गणनायका । मंगलमूर्ती विनायका सकळ मंगळदायका । विघांतका नमोस्तु ते ।। १ ।।
नमोस्तु ते वागीश्वरी । परम लावण्यरूप कुमारी । ब्रह्मदेवाचिये कुमारी । बैसे जिव्हांग्री शारदे ।। २।।

Scanned with CamScanner

जयजय मंगलवर दाइनी । कल्पलतिके कैवल्यदानी । जगन्नायके जगज्जननी । जयजय भवानी रेणुके ।। ३।। जय नमोस्तुते श्रीगुरूराया । दीनदयाळा दत्तात्रेया । पतितपावना लोकत्रया । तारावया प्रगटलासी ।। ४।। कैवल्य सुखाची विश्रांती । अखंडानंद चैतन्य ज्योति । सिध्द अविनाशा अवधूतमूर्ती । सह्याद्री पर्वती विराजमान ।। ५।। षडगुण मंडित षडभुज । सदा सुप्रसन्न मुखांबुज । अक्षयी तेजःपुंज । नक्षत्रराज उगवी ।। ६।। गुरूपद रजःकणासाठीं । तिष्टती अमरगणाच्या कोटी । रिध्दी सिध्दीसी पाठी । पसरूनी ओटी धांवती ।। ७।। मूळपीठ कोरी भूमिका शुध्द । येथे देव देवेश्वर लिंग प्रसिध्द । वसती कपिलादि मुनी सिध्द । सदा सन्निध रेणुका ।। ८।। सकल वृक्ष सकल लता । सकल तीर्थे सकल सरिता। सकल ऋषी सकल देवता । वसती अवधूता कारणे ।। ९।। नाना वृक्षांचे सुरम्य नाथ थाट । डांगी फळे लागली घनदाट । ठाईठाई रोधुनी वाट । तीर्थोदक पाट वहाती ।। १०।। नक्षत्रतुल्य चोहोंकडे । चमकती चिंतामणीचे खडे । सह्याद्री पर्वताचे कडे । खगासी वाकडे दाविती ।। ११।। जय जय दत्तअवधूत मूर्ती । म्हणूनी भक्तजन गर्जती । मंजूल शब्दें पर्वती । पक्षी वदती दत्तदत्त ।। १२।। विश्रांतीचे माहेर । सकळ सुखाचे माहूर । दुःख चिंतेची हुरहुर । पहातां दूर होतसे ।। १३।। जन्मा येऊनियां सृष्टी । जो न पाहेची माहूर दृष्टी । वृथा नवमास त्याचे साठीं । जननी कष्टी जहाली ।। १४।। जो कां त्रैलोक्याचा स्वामी । दत्तात्रेय स्मरगामी । कृपेनें नानारूपें भूमी । भक्तकामीं प्रगटत ।। १५।। महासिध्द ज्ञान पंडित । माला दंडकमंलु मंडित । गती गगनाची अखंडित । भक्त धुडीत साक्षेपें ।। १६।। अनंत ब्रह्मांडाच्या माळा । निमिषमात्रें अनंत वेळा । फिरवी त्याची अनंत कळा । अनंत काळा कळेना ।। १७।।


अनंत ब्रह्मांडाची चित्रें । जो नाचवी एक्याचि सूत्रें । अनंत रूपें इच्छामात्रें । अनंत रूपें दाखवी ।। १८।। नाही तुलना तुलितां नामा । नाही स्वरूपाची अन्य प्रतिमा । अगम्य गुणगण महिमा । नाही उपमा द्यावया ।। १९।। नामरूप गुणाच्या गणती गुणी । गणितां न पुरे दशशत फणी । म्हणूनी सप्रेम अंतःकरणीं । मस्तक चरणी ठेविन्नला ।। २०।। कथामृत सागरातुनी पूर्वी । व्यासें काढिली भरोनि चरवी । ती सज्ञानांसी न लाभली बरवी । अज्ञान करवी निर्बुध्द ।। २१।। प्रगटला कलीयुगी पुढती । श्रीपाद श्रीवल्लभ मूर्ती । सिध्द नृसिंह सरस्वती । पवित्र क्षिती करावया ।। २२।। श्रीगुरू चरित्र सुंदर । भक्ती मुक्तीचे मंदिर । त्याची सरस्वती गंगाधर । कथा सादर बोलिला ।। २३।। पृथ्वीवरी तदनंतर । वाढेल कलीचे मन्वंतर । तें पाप हरावया दुस्तर । अवतार धरियेला पुढती ।। २४।। तो हा अवतार निर्व्दद । पूर्ण आनंदाचा कंद । श्रीगुरू नाथ बालानंद। तुटे भवबंध चिंतिता ।। २५।। ब्रह्मा विष्णु महेश्वर । त्रैमूर्ती अवतार दिगंबर । दत्तात्रेय सदुरूवर । धरणीवर प्रगटला ।। २६।। ब्रह्म परायण ब्रह्म पुरूष । ब्रह्म सनातन धरी नरवेष । दर्शनमात्रे हरती दोष । निर्दोष यश धन जोडे ।। २७।। चैतन्य तेज मार्तंड । अज्ञानांधः कार करंड । भेदुनिया ब्रह्मांड । दीप अखंड उजळला ।। २८।। करूणामृताचा सागर । अचल धैर्याचा डोंगर । वैराग्य तपोनिधी शंकर । जो वरदकर भक्तजनां ।। २९।। मंगळाचे ते मंगळ । मंगळदासाचे वरद फळ । बालानंद पद निश्चळ । हरती कुश्चर पातके ।। ३०।। सकळ सिध्द साधकांचा मेरू । अवतार मालिकेचा गुरु । संसार सागर भवतारू । जगदगुरू जगदात्मा ।। ३१।। पवित्राचे ते पवित्र श्रीगुरू बालानंद स्तोत्र । परम पावन पुण्य चरित्र । परत्रवंत जाणोनी ।। ३२।। मी तो अगणित

Scanned with CamScanner

अपराधी । पतित पातकी मंदबुध्दि । सद्गुरू कथामृत निधी । मजसी कधी नुलंघवे ।। ३३।। परंतु करूनि अंगिकार । वक्तृत्वासी दिधला अधिकार । जगीं करविले परोपकार । त्याचा हा चमत्कार तोचि जाणे ।। ३४।। त्याची आज्ञा वंदोनि माथां । निमित्त मात्र मी झालों वक्ता । बालानंद स्तोत्र संहिता । कर्ता करविता सर्वत्र तो ।। ३५।। व्यास वाल्मीक शुक नारद । सिध्दसाधू भक्तबृंद । श्रोतयांचे चरणारविंद । तया वंदन साष्टांग ।। ३६।। जैसी गुरू आज्ञा मातें । तैसे अवलंबूनि नेमाते । कथामृत समर्पित तुम्हांते । ऐका श्रोते सज्जन हो ।। ३७।। देवभक्त कथेचा जोड । दोन शाखा एकचि मोड । सगुण अमृत फळें ही गोड । पुरवा कोड सज्जन हो ।। ३८।। श्रीगुरू कामधेनु माय । भक्त वत्सासी उणे काय । कथामृत दुधाची साय । प्रथमोध्याय गोड हा ।। ३९।। सत्य श्रीगुरू दत्तस्तोत्र पूर्ण । विष्णू दास म्हणे सुवर्ण । प्रथमाध्याय हा मुगुट भूषणकर्ण । दत्तात्रेयार्पणमस्तु ।। ४०।। मातापूर माहूर दत्तभुवन क्षेत्री विष्णुदास कवी करीत लेखन । दत्तगुरू बालानंद चरित्र गहन । भक्तां मनन मंत्रसिध्दी ।। ४१।।

## ।। श्रीबालानंद चरित्र-व्दितीयोध्यायः ।।

दंडकारंण्य पुण्यप्रदेश । विख्यात पाटणा कान्हदेश । खेडक गिरड ग्रामप्रदेश । संत सहवासे पवित्र ।। १।। अनुपम्य भाग्य गिरड ग्राम । वाटे केवळ चैतन्य धाम । निरसोनी जन्म मरणाचे श्रम । प्राणी विश्राम पावले ।। २।। सरिता स्वरूप अपर्णा । सकल कलिमल दोष हरणा । जी चिंतीतार्थ पूर्णा । जियेला गिरणा बोलती ।। ३।। तया गिरणेचे निर्मल जल । अमृतातुल्य प्रवाहे निर्मल । प्राशन करितां तात्काळ



भवरोग सकळ नासती ।। ४।। तया गिरणेचे तटी । गिरड गावाचे मठी । साक्षात् अवतरलासे धूर्जटी भक्तासाठी केवळ ।। ५।। तो महाराजा सिध्द पुरूष । महापुण्य श्लोक निर्दोष । निःसंग उदास विशेष मंगलदास नाम जया ।। ६।। दया क्षमा शांती आंगी । तपोनिधी महायोगी । निष्काम विषय विरागी ऐसा बैरागी महात्मा तो ।। ७।। तो सभाग्य भाग्यवंत । पूर्णज्ञानी भगवदभक्त । जयाचे हस्ते नित्यसत्य भगवंत दुध पीत असे ।। ८।। तया गिरड गांवांत । एक ब्राह्मण असे रहात । सुशील धर्मनिष्ट सुशांत नाम रघुनाथ जयाचे ।। ९।। सावित्री नामे त्याची भार्या । सदोदित तत्पर पतिकार्या । दानी पतिव्रता सद्गुणालया आर्या । कीं अनसूया दूसरी ।। १०।। संतानाविण असे कष्टी । होऊन गेली वर्षे साठी । पुढे पुत्रप्राप्तीची गोष्टी । परमेष्टी बोलू शकेना ।। ११।। होणार न टळे सुरेशा । सहस्त्रयत्नें सहस्त्रशीर्षा । कदाही पालटेना ब्रह्मरेषा । एका सतपुरूषां वांचोनी ।। १२।। मंगलदासांचिया दर्शना । नित्य येतसे ती अंगना । एके दिवसी अपूर्व जाणा । होणार तें कांही वर्तले ।। १३।। मंगलदास श्री भगवंता । स्वकरें दूध पाजीत असतां । त्या अलभ्यशा संधीत अतौता । पतिव्रता ते पावली ।। १४।। तों चमत्कार पाहुनी नयनी । अतिविस्मित होउनि मनी । देवभक्तांचे चरण वंदुनी । भामिनी उभी राहिली ।। १५।। दुर्लभ फल प्राप्तीचे अवसरी । निंबवृक्ष होता व्दारी । त्याची निंबोळी धरणीवरी । तेच वेळी पडियेली ।। १६।। मंगलदासे ती निंबोळी । घालुनि सतीचे करकमळी । म्हणे सुपुत्र फळ तूं वेल्हाळी । शीघ्रकाळी पावसी ।। १७।। चिंता न करीहो सर्वथा । हें फळ निश्चयें भक्षितां । पुत्र पावशी तूं आतां । दत्तात्रेया सारिखा ।। १८।। ऐसी ऐकूनी वरदवाणी । हर्ष पावली अतःकरणी । अत्यादरे फळ भक्षुनि । शीघ्र सदनी पावली

Scanned with CamScanner

।। १९।। साधुचे अढळ वरदान । करी सौभाग्य वायने दान । पुर्ण भरतां प्रसूत मान । पुत्र निधान लाभली ।। २०।। सुपुत्रा प्रसवली ती रामा । भवताप श्रम शांति विश्रामा । तेज:पुंज दिसे भामा । पूर्ण चंद्रमा ज्यापरी ।। २१।। मंगलदासाचा आशिर्वाद । फळा आला निरलस खेद । अवघाचि झाला ब्रह्मानंद बालानंद नाम ठेवियले ।। २२।। मंगलदास म्हणे अनुरागे । सकल दूर गेली दुर्भाग्यें । सौख्य पावाल याचेनि योगें । बहुकाय लागे बोलणे ।। २३।। बोले साध्वी नमुनि चरण । कैसे याचे गुणलक्षण । कृपा करूनि आपण । निरूपण करावे कीं ।। २४।। येरू वदे अवधारी । पुत्र तुझा निर्धारी । महा तपोनिधी ब्रह्मचारी । विरक्त संसारी होईल ।। २५।। ऐसे बोलतां मंगलदास । झाली कामिनी उदास । दु:ख कोटी श्वासोश्वास । कासावीस होतसे ।। २६।। मंगलदासासी म्हणे मंगल । हरिले वंध्यत्व अमंगल । परी लागला चिंता विंगळ । हे तो वोंगळ वाटते ।। २७।। आपण पुत्र दिधला संसारी । माझी इच्छा पुरविली सारी । परी तो नसावा ब्रह्मचारी । गृहचारी असावा गृहस्थ ।। २८।। मंगलदासाच्या चरणकमला । अभिवंदुनी वेळोवेळा । म्हणे पुत्रपौत्र संतती सोहळा । माझे डोळा दाखवी ।। २९।। ऐसे ऐकूनि ते क्षणी । मंगलदास बोले वरदवाणी । जे आवडी अत:करणीं । तैसीच झणीं पावसील ।। ३०।। परंतु हा वरूनियां युवती । प्राप्त होतांची पुत्र संतती । अवलंबूनि प्रपंच विरक्ती । तपोवना जाईल ।। ३१।। त्यासी होतील पुत्रपौत्र । महाभागवत भक्त पवित्र । वंदन करितील जन सर्वत्र । वाढेल चरित्र भूमंडळीं ।। ३२।। जैसे जैसे भक्त बोले । तैसे तैसे देव चाले । जिकडे भक्त संकेत सूत्र हाले । तिकडे पाऊल टाकीत ।। ३३।। भक्तजनें म्हणतां अंबाबाई । मग कुंकुमकंकणा उणेकाई । लुगडे नेसुन घाईघाई । धांवत पाई येतसे ।। ३४ ।।



भक्तांसाठी जगजेठी । लेई पीतांबर माला कंठी । अथवा जटामुकुट कौपीन कटी । कंथा गोमटी परी धारी ।। ३५।। जैसी भक्तांची भक्ती भावना । तैसे होणे नारायणा । सुभद्रेच्या स्वरूपे कामना । अर्जुनाची पुरविली ।। ३६।। असो मंगलदास तयेवेळां । तथास्तु म्हणुनी बोलिला । तैसेचि देव स्वरूपासी आला । आनंद झाला सतीशी ।। ३७।। यापरी ऐकुनी वरदोत्तरा । आनंदयुक्त ती सुंदरा । येउनिया निज मंदिरा । वृत्तांत भ्रतारा सांगतसे ।। ३८।। दोघेजणे खेद रहित । रहाते झाले आनंद भरित । बालानंद सदनी क्रीडत । गृहीं विचरत अवलीळे ।। ३९।। उपनयन वेदवृत्ती । परिणीली माया सुंदर युवती । लाधली सुपुत्र संतती । कुलोप्तत्ती कारणे ।। ४०।। जेंवी कमलपत्र जीवनी । तेंवी अलिप्त संसार भुवनीं । त्यागुनी स्त्रीसुत निघे वनी । पवित्र अवनी कराया ।। ४१।। शुध्द सत्व गुणाची प्रवृत्ती । नसे रजोतम विकृती । चित्तीं नसे विषयासक्ती । सहज विरक्ती सर्वदा ।। ४२।। महाराजा तो दत्तरूप सिध्द योगी । निजानंद ज्ञान विरागी । शमदम शांती ज्ञान अंगी । विवेके वना वेगें निघाला ।। ४३।। सिंहाद्री पर्वत घोर कानन । मूळ पीठ दत्तात्रेय स्थान । तेथें वैसला जैसा षडानन । तपानुष्टान साधावया ।। ४४।। श्रीगुरू कामधेनु माय । [illegible] वत्सासी उणे काय । कथामृत दुधाची साय । व्दितीयोध्याय गोड हा ।। ४५।। सत्य श्रीगुरू [illegible] पूर्ण । विष्णु दास म्हणे सुवर्ण । व्दितीयोध्याय भूषणकर्ण । दत्तात्रेयार्पणमस्तु ।। ४६।।

## ।। श्रीबालानंद चरित्र-त्रितीयोध्याय: ।।

श्री: ।। परमपवित्र अनुपम्य । सह्याद्रि पर्वत स्थानरम्य । नसे त्रिभुवनी त्या साम्य । अल्प वैषम्य असेना ।। १।। [illegible]त्या अश्वत्थ औदुंबर । अंब निंब दाळिंब जंबीर । रातांजन चुंबीत अंबर । शाखा संभार डोलती ।। २।।

Scanned with CamScanner

चंपक जाईजुई मालती । पारिजातक बकुल शेवंती । चंदन कृष्णागर केकती । सुगंध येती परिमळ ।। ३।। चकोर चातक मयुररावे । कोकिला भारव्दाज पारवे । नंदनवना हिणवून गर्वे । मंजूळ रवे बोलती ।। ४।। व्याघ्र अस्वल वानरवृक । रोही कुरंग तरस । जंबूक सांबर सायाल मुंगूस । वनास निशंक विहरति ।। ५।। अत्रि गौतगादि ऋषीजन । याज्ञवल्क्य परंपरा शतपथ ज्ञान । विस्तारिती पहातां ते स्थान । प्रपंच भान मावळे ।। ६।। परत्या करूनि रिध्दीसिध्दी । त्यागुनि सकल उपाधि । बालानंद लाउनि समाधी उग्र तपा साधीत ।। ७।। दत्तात्रयाचे मंदिरापाठीं । सह्याद्रिचे एकांत कपाटी । चरणावती तीर्थाच्याकाठी । तया धूर्जटी बैसला ।। ८।। प्रथमवर्षी भक्षिली फळें । व्दितीयवर्षी कंदमुळे । तृतीयवर्षी पल्लवकवले । चवथे वर्ष जळे लोटिले ।। ९।। पांचवेवर्षी आयु आहार । करितां न चले निर्धार । निश्वळ धैर्याचा आधार । तप अनिवार जहाले ।। १०।। ऐसीयापरी पंचवर्षे । दिव्य तपाचे उत्कर्षे । लोटली देवर्षी हर्षे । वृष्टी वर्षे सुमनांची ।। ११।। आकारली आपुलीच माया । झाकावया आपुलीच काया । आपुल्याच हातें केली छाया अनुसुयात्मजे चरण तृणाची ।। १२।। स्वमुखे गर्जत वरवाणी । माळा दंडकमंडलू पाणी । उभा राहिला दत्तचिंतामणी । भक्त आंगणीं कौतुकें ।। १३।। झाल्या जीवशिव भेटी । ब्रह्मानंदी पडली मिठी । त्या आनंद लहरीच्या गोष्टी । नये होठीं बोलतां ।। १४।। पुढें पर्वती दिवसचार । बैसुनि कथियेले विज्ञानविचार मग आज्ञा दिधली साचार । जगिं संचार करावया ।। १५।। सुवर्ण सुंदर षडभुजाकृती । व्दादश अंगुल प्रमाणमूर्ती । दत्तात्रेय प्रसाद अर्पिती । ती पहाती जन अद्यापि ।। १६।। सोडूनि सिंहाद्री पर्वत । तिर्थाटना निघाले त्वरित । बालोन्मत्त पिशाचवत । जगीं विचरत स्वइच्छे ।। १७।। गुप्तप्रगट मनोगामीं । भ्रमण



करीत भूमी । बहुळा गिरणा नदी संगमी । दुधखेडग्रामी पावले ।। १८।। तों बालानंदाच्या पुढती । दुध खेडग्रामी दत्तमूर्ती । प्रगटूनी ग्रामस्थ जनांप्रती । निवेदिती वेदांत ।। १९।। येथे येईल एकतापसी । माघ शिवरात्रीचे दिवसी । तो शिवविष्णुरूप दत्त तपोराशी । तुम्ही त्यासी ठेवून घेणे ।। २०।। तो होय सकला धार । करील जनतेचा उध्दार । यालागी तुम्हां वारंवार । हा सत्विचार सांगतसे ।। २१।। ऐसा सांगूनि संकेत । दत्तात्रेय झाले गुप्त । पुढे बालानंदगुरू नेमस्तकाली । येतसे त्यास्थळीं ।। २२।। गोकुलदास त्या ठाई । त्याची भार्या गंगाबाई । दोघेजणे लवलाही । येउनि पायीं लागती ।। २३।। नाही लौकिकाची चाड । नाही दृश्यवस्तूंची आवड । नाही याचना त्याग अवघड । क्रोधे दगड हाणिती ।। २४।। दोघेजणे क्षणोक्षणी अतिसप्रेम अंतःकरणीं । लोटांगणी लोटती धरणी । बळे चरणी झोंबती ।। २५।। येरू पुढेपुढे जाय वेगें । परी ते पाठी न सोडिती दोघे । न परतती पाठीमागे । लागवेगे धांवताती ।। २६।। ग्रामपर्यंत पर्वत वनाटणी । करितां भेटली देव तटिनी । दर्शनपुण्याची चढे उटणी । झडे खंडणी दोषांची ।। २७।। दोघेजणे त्याकाळीं । कौतुक पहाती आपुल्या डोळी । गुप्त जहाले गंगाजळीं । लवण मासळी ज्यापरी ।। २८।। बालानंद नापडे दृष्टी । म्हणोनि दोघे जहाली कष्टी । सप्तदिवस गंगातटी । निराहार पोटी राहिले ।। २९।। ऐसे पाहुनि निर्वाण । आत्वेदिनी सन्मुख जाण । बालानंद जैसी सीतलकिरण । चंद्रपूर्ण उगवला ।। ३०।। ऱ्हदयिं अत्यंत दाटली करूणा । आलिंगुनि दोघांजणां । काय मनकामना खुणा । कळवा आपणां म्हणती तैं ।। ३१।। ते वदती स्वामी संतपुरूषोत्तमा । मठ करोनि आमुचे ग्रामा । रहावे हे उचित तुम्हां । पावन आम्हा करावया ।। ३२।। अवश्य म्हणुनियां तातडी । येऊनि राहिले दुधखेडी । उभारली.

Scanned with CamScanner

स्वानंद गुढी । भक्त आवडी धावती ।। ३३।। विस्तारला कल्पवृक्ष । कीं सुरभी चिंतामणी प्रत्यक्ष । भूमंडळी उतरला मोक्ष । सर्वसाक्ष श्रीदत्तगुरू ।। ३४।। पुण्यवंत दुधग्रामी । बहुळा गिरणाच्या संगमी । बालानंद श्रीगुरूस्वामी । भक्ताकामी स्थिरावले ।। ३५।। मंत्रतंत्रयंत्र जपतप श्रेष्ठ । करितां जन पावती स्वेष्ट । परी देखतां गुरूचरणांगुष्ट । सकळाभीष्ठ ळाधती ।। ३६।। झाकलि नजाय चंडांशुज्योति । धरणी प्रकाशित करी अहोराती । उदंड प्रसरतसे योगकीर्ति । भक्तअभक्त धांवत येती ।। ३७।। जीजी वासना ज्याचे चित्ती । दर्शनमात्रे लाभे ती ती । संतती आणि संपत्ती । शीघ्र पावती कृपेने ।। ३८।। उदंड मिळोनि भक्तवृंद । करिती भजने गाती प्रबंध । गरजती रामकृष्ण मुकूंद । राधेगोविंद म्हणवूनि ।। ३९।। वीणा करताल झल्लरी । मोर चंग डोल मृंदगभेरी । सुखर वाजती वाजंतरी । निशाणे व्दारी फडकती ।। ४०।। श्रीदत्तगुरूरूप बालानंद सिध्दपुरूष । तयां कोण म्हणेल मानुष । उत्तरोत्तर महात्म्य विशेष । उदंड शिष्य जहाले ।। ४१।। तयांमाजी एक शिष्यपूर्ण । काशीकरनामे व्रतीब्राह्मण । रामदासस्वामीचा तैसाजाण । जैसा कल्याण अपूर्ण ।। ४२।। तो महाराज नैष्टिक ब्रह्मचारी । पूर्ण वैराग्य ज्ञानाधिकारी । तीर्थे हिंडतां पृथ्वीवरी । चारीधाम साधियेले ।। ४३।। भरोनी गंगोत्रीची कावडी । रामेश्वरा जात तातडी । जोडितां सुकृताची जोडी । पडिली धाडी विघ्नांचि ।। ४४।। मार्गक्रमितां सुजले पाय । चालतां नये खुंटला उपाय । म्हणे आतां हायहाय । करूंकाय शंकरा ।। ४५।। ऐसीया परी तो कष्टत । तो एके दिवसी अकस्मात । स्वप्नी येउनि सांगत । गिरिजानाथ तयासी ।। ४६।। बालानंद महाराज स्वामी । दत्तवतार प्रगटला भुमीं । बहुला गिरिजा संगमीं । दुधग्रामी रहातसे ।। ४७।। चित्तिं भाव धरोनि निर्मळ । तयासि घालावे गंगाजळ । ते रामेश्वरासी पावेल निश्चळ ।



सुकृत फळतुज लाभे ।। ४८।। ऐसे स्वप्नहोतां अवसरी । पावला दूधग्रामांतरी । बालानंदासी अभिषेक करी आपुलेकरी संतोषें ।। ४९।। अगाध सत्पूरूषाचे चरित्र । पहातां वर्तले विचित्र । सकल शरीरजहाले पवित्र । व्याधी अणुमात्र न राहिली ।। ५०।। मग प्रार्थुनी श्रीगुरूनाथा । चरणावरी ठेविला माथा । अनुभवे अनुभव आला सर्वथा । क्लेशकथा मावळली ।। ५१।। झिजवी चंदनापरी मात्र । सेवेसी तत्पर अहोरात्र । अंतर नपडे अणुमात्र । कृपेसी पात्र तो जहाला ।। ५२।। मग सदगुरू निजानंदी डोले । सर्वदा सर्व त्यासीच बोले । त्याचेनि अनुमते चाले । पान न हाले त्याविण ।। ५३।। बालानंद गुरू–पादुका । अलभ्य लाभल्या मुमुक्षुलोका । उत्तरोत्तर उदंड विवेका । शिष्यशाखा वाढल्या ।। ५४।। सकळ शिष्यासह परीवारी आषाढमासी पंढरपुरी । दत्तजयंती पुनः माहुरी । प्रतिसंवत्सरी नित्यक्रमें ।। ५५।। शोभती तुळसी माळा गळा । वाजती मृदंग झल्लरी करताळा । करीत भजनाचा सोहळा । भक्तमेळा जात असे ।। ५६।। करीत निष्पाप पवित्र भूमी । श्रीगुरू बालानंदस्वामी । पंथ आक्रमितां ग्रामोग्रामी । शिष्य गृहधामी पूजिती ।। ५७।। कोठेंकोठें एकदोनतीन दिवस । कोठें सप्तक अर्धमास । भक्तगृही करोनिवास । पुढे प्रवास होतसे ।। ५८ ।स्वइच्छे स्वस्तांत करणे । पर्वती तीनरात्र निवासकरणे । परंतु दर्शनाकारणे । देउळी जाणे नसेकी ।। ५९।। घ्यावया देवाच्या दर्शना । भक्तजन करिती प्रार्थना । गेलो होतो म्हणुनि खुणा । सर्व भावना सांगती ।। ६०।। सर्वजन आश्चर्य करिती । श्रीगुरूचरित्र नकळे वदती । साक्षात ही दत्तगुरूमुर्ती । क्षितीवरी अवतरली ।। ६१।। पुढे लौकिकी झालेगुप्त । परंतुतया प्रत्यक्ष देखती भक्त । दूधग्रामीं निजानंदी निवांत । दर्शन देती भक्तजना ।। ६२।। श्रीगुरू बालानंदाचे प्रख्यात । सुशील पुत्र गोपाळनंद नाथ । दत्तदीक्षा घेऊनि यथार्थ । सदा

वर्तले वडिलोपचारी ।। ६३।। जातां पंढरपुरी माहुरी । कधी ना राहुदिली वारी । भक्तवृंदासह पूर्वमार्ग धरी । प्रतिसंवत्सरी निजप्रेमें ।। ६४।। तो महाराज सिध्दपुरूष । बालानंदगुरू शुध्दअंश । सर्वत्र घेती जन उपदेश । बहुतशिष्य पसरले ।। ६५।। गोपालानंदासी तिघे जण । जहाले पुत्र दत्त परायण । वडीला नाम नारायण । केशव विष्णु जाणावे ।। ६६।। तो सत्य संतनारायण । श्रीनारायण विष्णु परायण । जगदोध्दारा जाण । तीर्थाटण करीतअसे ।। ६७।। तो महाकृपाघन । श्रीगुरूनाथ परमपावन । करी माहुर क्षेत्री गमना गमन । प्रस्तुतजन देखती ।। ६८।। बहुळानाम शुभांगा । उत्तरवाहिनी वाहे गंगा । तिचिये पुर्वेच्याभागीं अभंगा । समाधि जागा विराजे ।। ६९।। अति निकट गंगातटी । न्यग्रोध वृक्षाचे तळवटी । वटपत्र शार्दुल जगजेठी । भक्तांसाठी अवतरला ।। ७०।। भगवंत आणि भगवदभक्त । जळगार न्याये अविभक्त । तयाते जो नर मानेल व्यक्त । तो तव उन्मत्त अज्ञानी ।। ७१।। आनंद सागराचे भरते । आले सप्रेम लहरीवर्ते वाटे लक्ष्मीच्या भर्ते । परते केले वैकुंठ ।। ७२।। असो श्रीगुरू बालानंद । स्वामी महाराज निर्व्दद । त्याचेनि भ्रमर पादारविंद । मकरंद सेविती अक्षयीं ।। ७३।। अखंड भजन पुराण सप्ताह । भक्तकरिती सप्रेमचि प्रवाह भगवन्नाम संकीर्तन भवापह । भगवंत तेथे तिष्टतसे ।। ७४।। संसार सागर तारका । बालानंद गुण पादुका सुशोभित मठमंडप नौका । पुढती पताका झळकती ।। ७५।। श्रीगुरूंची अनुपम्य कीर्ती । उदंड पसरली मही वरती । ऐकुनि अनेक कामना चित्ती । धरूनि येती कामीक ।। ७६।। क्षयकुष्ट उन्मत्त अपस्मार । संग्रहणी अर्श अतिसार । श्रीगुरूसी करितां नमस्कार । सकल विकार दूर होती ।। ७७।। ग्रहपीडा संबंध जाती । वंध्येसी लाभे पुत्रसंतती । दरिद्री भोगुनि संपत्ती । भुक्ति मुक्ति भक्त पावे ।। ७८।। असंख्यात तरले तरती पुढे ।



श्रीगुरू स्तोत्राचे पोवाडे । विस्तारे वर्णितां वाढे । भारता एवढे किंचितही ।। ७९।। यालागी सर्वभावे सर्वथा । चरणावरी ठेविला माथां । प्रार्थना हीच श्रीगुरूनाथा । दीन अनाथा उध्दरावे ।। ८०।। श्रीगुरू कामधेनु माय । भक्त वत्सासी उणे काय । कथामृत दुधाची साय । तृतीयोध्याय गोड हा ।। ८१।। सत्य श्रीगुरू व्रत पूर्ण । विष्णु दास म्हणे सुवर्ण । तृतीयोध्याय भूषणकर्ण । दत्तात्रेयार्पणमस्तु ।। ८२।।

## ।। श्रीबालानंद चरित्र-चतुर्थोध्यायः ।।

श्रीः ।। जयजय ब्रह्मांडगर्भ संभूता । ब्रह्मसनातन महत्भूता । ब्रह्मवेत्या सदगुरूनाथा । श्रीअवधूता नमोस्तुते ।। १।। जयजय ब्रह्मानंद सनातना । अत्रिअनुसया नंदना । उन्मत्त षड्रिपु गजमर्दना । जनार्दना नमोस्तुते ।। २।। जयजय स्वामी विश्वंभरा । धीरउदारा गुणगंभीरा । दत्त अवतारा दिगंबरा । कृपासागरा नमोस्तुते ।। ३।। जयजय सच्चित सुखानंदा । सकल आनंदाच्या मूळकंदा । दावि डोळा परमानंदा । बालानंदा नमोस्तुते ।। ४।। सदगुणचे लागतां पदां । जन्मांतरीच्या हरति आपदा नाही घडली अमर्यादा । आजवर कदा या वचनाची ।। ५।। ऐकुनि आलो कीर्तीमोठी । माझे अपराध शतकोटी । तुम्हां घालणे लगे पोटी । ब्रीदा-साठी आपुल्या ।। ६।। तारल्यावीण खटनट खोटे । तारकपणा मिरवाल कोठे । ऐसीजरी सोसाल झटें । पर्वत मोठे अद्भुतपणे ।। ७।। दीनअनाथांसी अव्हेरितां । लघुत्व पावता लक्ष्मीचा भर्ता । समुद्र जहाला असतां रिता । सरिता पोटीं न घालितां ।। ८।। आम्ही यावे तुम्हासी शरण । तुम्ही आमुचे करावे रक्षण । हें कृतकृत्य केल्यावीण । देवा देवपण नचयेई ।। ९।। म्हणाल उदंडतारीले पूर्वी । त्या सत्कृत्यें भरलीउर्वी । याचक एकही

न मागे फिरवी । ब्रीद न हरवी सदात्याचे ।। १०।। किंवा म्हणाल आपण जेव्हां । चित्तीं विश्वास राखावा । हा दमतरी कोठवर राखावा । मार्ग देखावा कैशापरी ।। ११।। महाराजा कृपानिधी । मजवरी कृपा करालकधी आहे जोंवरी हे आयुष्य अवधी । तोंवरी संधी साधावी ।। १२।। प्रथम जननीजठर शुंडी । नवमास पचलो गर्भपिंडी । मांसरूधिर मलमुत्रकुंडी । पडिलो मुंडी घासीत ।। १३।। बाळपण काळसोय । नेणवे अपाय उपाय । वृश्चिक शयनी निजवीमाय । गाणे गाय कौतुके ।। १४।। ज्ञानउन्माद तरूणपणी । रूतलो विषय कंटककुरणी । केवळ होती नामस्मरणी । तरूणी हरिणी प्रमदाक्षी ।। १५।। गळां पडला प्रपंच पाश । सुटला धनाचा हव्यास । झिजत चालले रक्तमांस । मासोमास जरायेई ।। १६।। दरीद्रता अवदशा लागलीपाठी पडो नदेई कवडी गांठी । धनासाठी शतकोटी । उठती पोटी कल्पना ।। १७।। ऐसे वर्ततां वृध्दापकाल । आला सरतां । परंतु मरतां मरतां । लक्ष्मी भरतां नाठवे ।। १८।। दूर होतील दाससुत । धरोनि नेति यमदुत करिती जाचणी अद्‌भुत । आणती भूत क्षणोक्षणी ।। १९।। जोंवरीं मृत्युचा न वाजला घाव । तोंवरीं साधे अवघा उपाव । यालागीं त्वराकरूनी धांव । मजसी पाव दयाळा ।। २०।। आवर्तलो अभिमानें संसारी । तेणे बुडवण आली सारी । माझा मीच जहालो वैरी । कोणावरी रूसावे ।। २१।। केला इंद्रियांचा लाड । सदा घेतली निद्रागाढ । आडवा पडला अज्ञानपहाड । त्याआड श्रीहरी जहाला ।। २२।। संसार भार वाहक खर वाहवतां वाहवलो आखर । उठले श्वास । सभोवती घरघर । मग अनखर वाटले ।। २३।। विषयचरकी दिधली वृत्ती अघोर । सत्कर्मयोगा नेणती कर । कामक्रोधादींचा चाकर । तस्कर हितकर भासती ।। २४।। दुर्लभ हे लाभुनि नरकाया । ती अर्पिली विषयनरकाया । मतिमंदेच्या वेळां घालविलीवायां । बोलावया लाजवाटे ।। २५।।



नाहींच शांततेला कोठे ठिकाणा । कर्तव्य कठीण सांगावे कोणा । आतां माझी शुध्दकरूणा । नारायणा कैची येईल ।। २६।। घडला साधुसंत व्देष । सज्जननिंदा केली विशेष । यमयातना करितील निःशेष । पुढचे भविष्य कळे सहज ।। २७।। शरण जावे ज्याज्या देवा । ते ते इच्छिती पूजा सेवा । नाही पदरी पुण्यठेवा म्हणुनि मानवा उपेक्षिती ।। २८।। नाही तीर्थाटण शक्ति । धर्माचरणा नसे संपत्ती । ज्ञानसंपादनासी साधन वृत्ती । विपत्ती प्रभाती उभीपुढे ।। २९।। नये जपसाधन एकहि मंत्र । कैचे यंत्र केचे तंत्र । हा जरी अपवित्र परी पवित्र केला पाहिजे ।। ३०।। म्हणाल आपण आपुल्या हाती । कामक्रोधांची करूनी शांती । प्रपंचावरी लोटावी माती । हे तों कल्पांती घडेना ।। ३१।। स्वर्ग सोडिल ऐरावती । शंकरा भवानी पार्वती । सदगुरू भव सागरी न तारिती । ऐसे कैसे घडेल ।। ३२।। जगत्ताप न सोशील जगती । तक्षका दंशकरी परिक्षिती । शरणांगता देव उपेक्षिती । हेही घडणे अशक्यप्राय ।। ३३।। नरोटीत उदभवतील मोती । चिरगुटी लपेल दीप ज्योती । भक्तासी रिक्तफिरवील हरिभक्ति । ऐसीयापरी जाणावे ।। ३४।। अग्नि निद्राघेई तृणावरती । पाषाणी कमळे उगवती । दोषतम लोपती भागवती । लौकिकरीति असंभाव्य ।। ३५।। मृगजळी पाषाण वहावती । कज्जलें नक्षत्रमाला तरंगती । अधःपाती पाडील संतसंगती । अशक्य सर्वथा लोकांत हें ।। ३६।। शेष चढेल पृथ्वीवरती । पालटेल सूर्याची आवृत्ती । स्मृर्तुगामी न राहील दत्तकीर्ती । कधींतरी ऐसे घडेल कां ।। ३७।। गर्भिणी होईल कुमारी । गिळितील गगनी चंद्रारी । जाईल मी माघारी । पतीत कीं ।। ३८।। प्रभोतुम्ही जहाले जरी वाकडे । मग म्यांजावे कोणीकडे । रामचंद्रा सोडुनि माकडे । रावणाकडे केविजाती ।। ३९।। ही विनंती माझी राखी । मनेंद्रियाचे गुराखी । तुझे प्रसिध्द ब्रीद राखी । ठेवि सुखी भक्तां आम्हां ।। ४०।। माझे चंचल

Scanned with CamScanner

मन वळवावे । कामक्रोध अबोध पळवावे । मी कोण हे मज कळवावे । आळवावे आत्मारामा ।। ४१।। तुचि गुरूदेव धन्य बापमाय । म्हणुनि धरीले पुज्यपाय । क्षमाकरी सकल अन्याय । बहुकाय बोलो आतां ।। ४२।। कृपेने आतां कृपामूर्ती । कृपाकरावी कृपाकीर्ती । भक्ति प्रेमा द्यावी स्फूर्ती । सूज्ञामति काय लिहिणे ।। ४३।। ठेविला देह श्रीगुरूचरणी । द्रवलास्वामी अंतःकरणी । प्रसन्न जहाला तत्क्षणी । गळाली लेखणी अहंकृति ।। ४४।। कृपावंत श्रीगुरूनाथ । सगददवाचा ऱ्हदयस्थ । मस्तकीनित्य वरदहस्त । वचन नेमस्त उदारत्वें ।। ४५।। जेजे हे केले माझे स्तवन । ते उपनिषदार्थ पावन । या शुब्दसुमने देवतार्चन । भजन पूजन साधिले ।। ४६।। येणेचि घडले सकळ दान । संपूर्ण तीर्थ गंगास्नान । येणे श्रवणमनन ध्यान । निजात्मज्ञान साधिले ।। ४७।। मुख्यतः केलियावरी अंगिकार । सहजत्वें होय साक्षात्कार । गुरूभक्तिचा अधिकार । नमस्कार निरहंकारे ।। ४८।। ऐसा श्रीगुरूनाथ वरा लाधलो । विशुध्द प्रेमभावा विनटलो । जन्मा येउनि कृतकृत्य जहालो । अंत र्बाह्य शोभलो गुरूधामीं ।। ४९।। श्रीगुरूराय नारायणस्वामी । राहिलो मी दुधखेड सुग्रामी । करूनि उत्सव पर्वणी रामनवमी । माता रेणुकाधामी पावलो ।। ५०।। कामधेनु तूं श्रीज्ञान माय । आत्मवत्सासी मग उणे काय । कथामृत दुधाची साय । चतुर्थोध्याय दत्तकथा ।। ५१।। सत्य श्रीगुरू व्रत पूर्ण । विष्णु दास महणे सुवर्ण । तृतीयोध्याय भूषणकर्ण । दत्तात्रेयार्पणामस्तु ।। ५२।। दूधग्राम मातापूर । सिध्द दत्त अवतार माहुर । वारकरी भागवत पंढरपुर । बालानंद सारकथा ।। ५३।।



## ।। श्रीबालानंद चरित्र-पंचमोध्यायः ।।

ॐश्रीः।। श्रीगुरूपद चिंतीत चित्तांत । मातापूरी असतां निवांत । मार्गशीर्ष मासापर्यंत । सप्तमास जहाले ।। १।। एकेदिनी श्रीगुरूमूर्ती । स्वप्नी येउनि निरोपिती । कथेचि सांगूनि फलश्रुती । कथासंपूर्ती करावी ।। २।। निर्फल प्रफुल्लित पळस । बक्षी बैसावया करिती आळस । दिसे स्फटिक देवालय तळास । परी कमलहीन जैसे ।। ३।। जो सहस्त्रकर मित्राचा मित्र । जो सहस्त्र नेत्राचा नेत्र । स्वप्नी मंदनेत्रास उपनेत्र । सहलेखन पत्र देतसे ।। ४।। त्या उपनेत्रासी दोनीकडे । सतेज शंख शस्त्राचे आंकडे । कानावरी ठेविलेसे फाकडे । परी पडती तुकडे हालतांची ।। ५।। ऐसे सहस्त्रनेम अर्पिले । म्हणती चित्तस्थीर ठेव आपुले । चंचल होतांच अपाप भले । कानकापले जातील ।। ६।। भोजना बैसवीले ब्राह्मणपाटीं । पक्वान्नाचे भरल्याताटी । ठेवितां कोरडी घृताचीवाटी । विषाद पोटी कां नयेल ।। ७।। सप्तमास होउन गेले । सत्य सप्तव्रतगुरूचे केले । ते फल श्रुतीविण वहिले । स्वानंदे श्रवणलाभ देईल ।। ८।। ऐसा गुरूआज्ञेचा संकल्प । तैसा कथिला कथाकल्प । येथे भक्तजन हो विकल्प । चित्ती अल्प न आणावा ।। ९।। पतीतपावनाचे काजी । त्याची योजना तोचि योजी येथे वक्तृत्वता नसे माझी । विशेष मर्जी प्रभुची ।। १०।। भक्तअभक्त विरक्त । ग्रापंचिक विषयासक्त । विविध जनही होतीलमुक्त । श्रीगुरूसूक्त हे पाठ करितां ।। ११।। दातासमर्थ गुरूनायक । भुक्तिमुक्ति पद दायक । स्तोत्र मंत्राक्षर एकेक । अभिषेक जिवाशिवा ।। १२।। नित्य होतां अमृतस्तोत्रावृत्तीं । पाळटूनी जय अज्ञान प्रवृत्ती । होयज्ञान विज्ञान विवृत्ती । सुटे विकृति मायेची ।। १३।। वाचितां ऐकतां प्रातः संध्या । पुत्रफला लाभतील वंध्या । निरसूनी दुःख अविद्या । ब्रह्मविद्या मार्ग कळेल ।। १४।। हरतील दुर्धर कर्मभोग । जातील

Scanned with CamScanner

दरिद्र वियोग रोग । लाभतील सकल अभीष्ट सुखभोग । वाढेल योग कीर्तीचा ।। १५ ।। शत्रू संग्राम संकटी श्रीगुरूसूक्त हे जपतां कंठी । विजयलक्ष्मी लागेपाठी । विघ्नकोटी मावळती ।। १६ ।। नित्यनेमें पाठ करितां । दूधग्रामी श्रीउपासना धरितां । निंब अश्वत्थ वट समाधी पूजितां । भवभय व्यथा परीहरेल ।। १७ ।। स्तोत्र ओवीश्लोक व्दयशतसार । कर्ता येथे बालानंदगुरूवर । दत्तभक्ता श्रोतया अजरामर । दत्तदिगांबर गुरूवर्य ।। १८ ।। दत्तगुरूनाथा जावे शरण । श्रीगुरूचरित्र प्रेमेश्रवण । षोडशअवतार दत्तगुरू स्मरण । जयंती व्रताचरण करावे ।। १९ ।। दशावतारापूर्वी दत्तावतार । एकमुखी त्रयमुखी वेदाधार ब्रह्मचर्य गगनसंचार । दत्तमंदीर स्थान जयां ।। २० ।। माहूर काशी करवीर । नेपाळ गोकर्ण कृष्णातीर पंचगंगा गाणगपूर । श्रीशैल दत्तसिध्द क्षेत्रें ।। २१ ।। चारीपुरूषार्थ पुष्टीतुष्टी जयसाधन । श्रीगुरूकथा मलयगिरी चंदन । सुगंध सुरभ दिव्य उटी प्रसन्न वदन । श्रीखंड राजोपचार ।। २२ ।। मार्गशीर्षादी शुक्लपक्षी प्रतिमासी । आचरावे दत्तषोडश जयंती उत्सवासी । पूजापूर्णार्ती समाराधना महा अर्चनासी । दत्तगुरू प्रीतिसी श्रध्दाभवे ।। २३ ।। सिंहासन चौरंग पीठिका । सुगंधी रंगवल्ली प्रकाशदीपिका । घृत तैलःनीरांजन कदलीपताका । दत्तपादुका कलशावरी ।। २४ ।। पंचामृत अमृताभिषेक स्नान । राजोपचार महावस्त्रें संपुजन । पुष्प धूपदीप तुलसी नैवेद्य फलतांबूल दान क्षीर दक्षणा मानसपुजा ।। २५ ।। सुगंध पुष्प दिव्य वनमाला । ऐसाच ब्राह्मणपुजन सोहळा । अभिवादन नाममाळा । पारायणकथा अनुष्टाने ।। २६ ।। आरती प्रार्थना उत्तरपुजा व्हावी । विधिविष्णु शिवमुर्ती ध्यावी प्रसादफले क्षीर भक्ता वाटावी । दक्षिणा द्यावी ब्राह्मणांसी ।। २७ ।। क्षीर प्रसाद समस्त जनासीं । इच्छित वस्त्रांत्रे ब्राह्मणासी । या योगे सगुण निर्गुण दत्तमानसी । परमानंदे संतोषें ।। २८ ।। प्रातःकाळीं वट अश्वत्थ



औदुंबरतळी । त्रिवेणी निंब तुळसी पादुकामूर्ती जवळी । रूद्राभिषेक न्यास पुष्पांजुळी । पूजनपूर्णार्ती नैवेद्य वाद्यादी ।। २९ ।। त्रयवृक्ष निंब अमृतमहिमान । बालानंद तयावृक्षगुळी विराजमान । स्वयें सांगती श्रीगुरू विधान । प्रचिती निधान पाहोत भक्त ।। ३० ।। सत्यव्रत सत्यगुरू सत्यव्रत । सत्यसंकल्प सत्यभक्त । सत्यका मना सत्यसाक्ष सत्यप्रचीत । निश्चयोसत्य सत्यकाळ ।। ३१ ।। द्दढनिश्चयें आदरितां साधन । प्राप्तहोतील रत्न सुवर्ण भूमीधन । आक्रमण भयंकर निरसोनि बंधन । सप्ताह पारायणे अनुष्टाने ।। ३२ ।। कल्पयोगी स्मरगामी कल्पज्ञानी अंतर्यामी । कल्पभक्ति स्तोत्रश्रवण देवधामी । सदैव गुरूस्वामी सर्वत्र ।। ३३ ।। सर्वस्थळी सर्वकाळी रक्षी । गायक भक्तां दीनां नुपेक्षी । दत्त म्हणतांचि ये सकलसाक्षी । प्रेमअपेक्षी शुध्दमनें ।। ३४ ।। दुर्घट संकट विघ्न आलियाहि । स्तोत्रपारायण करावे लवलाही। असावे विश्वासे शुचिर्भुतदेही । प्रतिग्रह कलह वर्जुनियां।। ३५ ।। स्वप्नामाजी सदगुरूनाथ । प्रगटोनि सांगतीळ द्दष्टांत । सत्यभावनेनें सत्यचिंतीतार्थ । पुरतील सत्य जाणिजे ।। ३६ ।। शमतील ग्रहबाधा संबंध । ब्रह्मविद्येने तुटतील भवबंध । दत्तगुरूस्वरूप बालानंद । ब्रह्मानंद करील सदा ।। ३७ ।। श्रीगुरू कामधेनु अमृतवृष्टि मेरू । ज्यास्थळीं हे कथाकाव्य कल्पतरू । कलाज्ञान ऐश्वर्य सौख्यसंभारू । आपेआप प्रगटतील ।। ३८ ।। श्रीगुरूनाथ स्तोत्र चिंतामणी । कथापारायण सौभाग्य खाणी । धर्म अर्थ काममोक्ष सूक्त मंत्र पठणी । भक्तप्राणी लाभतील ।। ३९ ।। अरिष्ट अपघात उपघात । अनिष्ट अघौघ गंडांतरादि आघात । भूत दैव ग्रह शत्रूरोग निवांत । होतील शांत जपतपभक्ती सदाचारे ।। ४० ।। दीनोंव्दारा दीनबंधु । अल्प आयास सांगती साधू । अवधान अमृत प्राशन ज्ञानसिंधू । एकचि बिंदु अमर करी ।। ४१ ।। श्रीगुरूदत्त चरित्राचे फळ । शोडषअवतार बालानंद त्रिवेणी तीर्थजळ । सप्तकथा

Scanned with CamScanner

अध्याय पारायण कमळ । विज्ञान निर्मळ त्रिकालें ।। ४२।। समुद्रोदकी कासया जावे । व्यर्थश्रम कासया पावावे । राजांगनेनें कासया भयभीतव्हावे । श्रध्दा मौक्तिक अलंकारे ।। ४३।। प्रसूतिकाली गौतमीचां । संधीसाधिली गोतमेचि । घालितां प्रदक्षिणा सर्वेचि । पृथ्वीप्रदक्षिणा फळलाभे ।। ४४।। शतकोटी रामायण श्रीमत् भागवत पारायण । लाभती श्रध्दाभक्ति परायण । श्रीरामकृष्ण भजनेचि ।। ४५।। ही परम उत्कृष्ट दत्तगुरू प्रीती । मजलागी मानवली गुरूदत्तभक्ती । ऐसे गीताभागवती । स्वयें श्रीपती अनुवादें ।। ४६।। यास्तव श्रीगुरूपदां । स्मरतां हरती अनेकआपदां । सफळ सकळ संसारघंदा । बालानंदा चिंतितां ।। ४७।। स्तोत्रकथा समुद्रतीरास पोंचलों । श्रीगुरूदत्तनाम सांगडीने पोहिलों । वागविले तैसे वागलो । नाही बोललो मींपणे ।। ४८।। विष्णुदास कवीवदे ग्रंथटीका । करणार श्रीगुरूदत्तनाथ पादुका । श्रीजगदंबा मूळ पीठ नायका । माझी रेणुका माउली ।। ४९।। शके अठराशें चवदा वर्षी । नंदननाम संवत्सरासी । मार्गशीर्ष शुध्द त्रयोदशीस । श्रीगुरूलागी हे समर्पिले ।।५०।। श्रीगुरू कामधेनु माय । भक्त वत्सासी उणे काय । कथामृत दुधाची साय । पंचमोध्याय गोडहा ।।५१।। सत्य श्रीगुरू व्रतकथा पूर्ण । विष्णुदास म्हणे सुवर्ण । पंचमोध्याय भूषणकर्ण । दत्तात्रेयार्पणमस्तु ।।५२।। माहुर दत्त रेणुकांबा कथा प्रबंध । विष्णुदास संत बालानंद । दुधग्राम समाधि ब्रह्मानंद । विधि विष्णु शिव रूपा नमस्ते ।।५३।।



## || श्रीबालानंद चरित्र-अध्याय ६ वा ||



बालानंद दत्तरूपं । योगी नारायणं गुरूं ।। चैतन्यं तमहं वन्दे । समाधी ध्यान दर्शनं ।।१।।

ॐश्रीगणेश सरस्वती । रेणुका काली भगवती । सच्चिदानंद आदिनाथ शक्ती । गुरूपरंपरा ज्ञानेश्वर ।। १।। संतभक्त ग्रह सप्तर्षी । धृवप्रल्हाद देवर्षी । धर्माचार्य राजर्षी । वेदपुराण वाङमय ।। २।। याज्ञवल्क्य सिध्दगुरू । दत्तात्रेय ज्ञानमेरू । कर्म योगी कल्पतरू । भागवत वारकरी नमस्ते ।। ३।। श्रीबालानंद दत्तअवतार। सिध्द वरदलीला अपार । त्यांचे चरित्र कथासार विष्णुदास कवीने लिहिले असे ।। ४।। शके अठराशे चवदा शकात । बालानंद गुरूचरीत्रप्रत । विष्णुदास रची मातापुरात प्रासादीक वाणीनें ।। ५।। त्यानंतर बासष्ट वर्षानें । पंडितविष्णु हा लिहीत अज्ञाने । उत्तरार्ध दोनअध्याय नेमाने । सप्ताहपुर्ण व्हावया ।। ६।। सूर्यापुढे दीपप्रकाश । विष्णु माया पुढती आकाश । तैशापरी संतचरीत्र अवकाश । निवेदीत यथामति ।। ७।।संतभक्ताचिया कथा । प्रमुकथेसमान सर्वथा । ऐसे ज्ञानेश्वर वदती यथार्था । संतजर्नी जाणावे ।। ८।। शके सोळाशेंच्या प्रारंभांत । महाराष्ट्रांत होते संतभक्त । तयांच्या संतरत्न मालिकेत । बालानंद शोभले ।। ९।। अमळनेरचे

सखाराम त्यागी । हरीहरेश्वर पिंपळगावचे गोविंदबुवा योगी । मंगलदास विरागी । मल्हारस्वामी वेरूळचे ।। १०।। दौलताबादचे मानपुरी । बहिरगावचे हिरापुरी । शेंदुरबादचे मध्वनाथ हरी । तीर्थप्रदक्षणा करीत फिरती ।। ११।। औरंगाबादचे निपटनिरंजन । संतकवी अमृतरायमहान । पांडवप्रताप कर्ते श्रीधरकवी गहन शिवदिनकेसरी पैठणचे ।। १२।। यावनीय धर्मराजसत्ता माजली । धर्मरक्षणा जागा न उरली । ऐशा संकट परंपराकालीं । ही सन्तमंडळी सरसावली ।। १३।। ज्ञानभक्ति वैराग्य । जनां सांगूनी धर्ममार्ग योग्य । स्वदेश स्वराष्ट्रभक्ती भाग्य । जनता तारिली स्वार्थत्यागे ।। १४।। खानदेशांत गिरणानदी बहुजला । तेथे नदीवाहे बहुळा । तेथे मंगदाससाधु ज्ञानकला । गिरडगांवी प्रेमळभक्त।। १५।। त्यांचें हातचेदुध धारोष्ण स्वयेंप्राशी नारायण कृष्ण । गीतगातां राधेकृष्ण । आनंदकंद नृत्यकरी ।। १६।। रधुनाथ ब्राह्मणाची वंध्या स्त्री । तेथे दर्शना येत सावित्री । ती रंगली इहपरत्री । सद्भावना धारणेनें ।। १७।। मंगलदासे दिली लिंबोळी । तीश्रद्दा भावे सगळीगिळी । पुत्रफळापावे योग्यवेळी । भक्तिउदार वृत्तीनें ।। १८।। साठवर्षाचिया अंती । हे जहाली पुत्रसंतती । मार्कंडेयापरी हर्षखेद भ्रांती । प्रपंचात समाधान ।। १९।। तो बालानंद दत्तावतार जन्मताच वेदशास्त्र ज्ञाना ऽ धार । पंचवीसवर्षे करूनि संसार । वैराग्यपूर्ण मग घेई ।। २०।। एक वर्षाचा सुत जहाला गोपालानंदनाम लाधला । पूर्वकर्मधर्म योगें जहाला । विरक्त होत बालानंद ।। २१।। ज्ञानभक्ती वैराग्यत्याग स्वीकारूनी परमार्थ योग । एकांतसाधना विज्ञान अव्यंग । सह्याद्रिपर्वती पातले ।। २२।। ते महाकालीचे मातृस्थान । परशुराम तीर्थभुवन । आमलकी कृष्णा क्षेत्रपावन । मातापूर माहूर ।। २३।। सर्वतीर्थ मातृतीर्थ । विष्णुतीर्थ चक्रतीर्थ । कालीतीर्थ ज्ञानतीर्थ । मातापूर अनादि ।। २४।। सिध्दयोगी दत्तात्रेय विश्रांती घेत । जे



दत्तावतार षोडश होत । त्यांतील दोनअवतार ख्यात । मातापूर क्षेत्री असती ।। २५।। देवदेवेश्वर नामेकरून ग्रामाजवळी जे असे शिवस्थान । तेथे शिवलिंग प्राचीन । ते सिध्ददत्त प्राचीनअसे ।। २६।। त्यास्थानी आतां महानुभाव । असती आक्रमूनी दैवीभाव । त्यांचेचि जहाले अभिनव । दत्तस्थान प्राकृतसम ।। २७।। दुसरे स्थानसिध्द अवधूत । तें सह्याद्री कडेवरी शोभिवंत । तेथे निर्बाणी गोसावीमंडळ वसत । पूजाअर्चा व्यवस्थेने ।। २८।। तया सिध्ददत्त कपाटामागे । बालानंद महानुष्टान योगे । मातापूर देवी दत्तउत्संगी । ब्रह्मानंद तपें निमग्न ।। २९।। फलपुष्प लतावृक्ष । आपण इच्छाभोग निरपेक्ष । सेवा श्रध्दा सदाचार दक्ष । तपवर्षे तपकरी ।। ३०।। त्रिकाल ज्ञानयोगसिध्दी । भाग्यवैराग्य वाणीसमृध्दि । मिळाली सगुणदत्तमुर्ती सज्ञान बुध्दी । साक्षात्कार प्रसाद ।। ३१।। श्रीदत्तआज्ञा जैसीहोत । तैसे जगांत संचारचालत । देशराष्ट्रभक्त धर्म उध्दारार्थ । गुप्तप्रगट नित्ययात्रा ।। ३२।। ज्योतिर्लिंगे पंढरपूर । काशीबद्री रामेश्वर । पहात जाती पाटणापुर । गिरणा तीरानें ।। ३३।। तों श्रीदत्तसिध्द सूचनेनुसार । दूधग्रामी भक्तअपार । वाटपहाती तवहीमुर्ती उदाससंचार पाहुनी जन प्रार्थितात ।। ३४।। मोठयाकष्टें भक्तहितार्थ । दूधग्रामी राहिले जनकार्यार्थ । सांगती प्रपंचपर मार्थ । ज्ञानविज्ञान भक्तिमार्ग ।। ३५।। अनेक सहशिष्यसंत । सहजन महामहंत । सहपरीवार श्रीमंत । दर्शना येती सतत ।। ३६।। दूरदेशीचेहि जनयेती । इच्छितकामना लाधुनी जाती । गाणगापुरी श्रीनृसिंहसरस्वती तैसेचि दत्तगुरू हे ।। ३७।। विद्वान् धनवान् । गुणवान् तर्कवान् । संतर्पणे अनुभवें पूजन । स्तुतीसुमनें वर्षीत ।। ३८।। जेजे जयानें इच्छावे । तेते तयानें लाधावे । श्रीगुरूबोल सत्यव्हावे । महिमाअपार विस्तारला ।। ३९।। ॐश्रीं रेणुका परशुराम मातापूर । श्रीदत्तषोडश सिध्दावतार । ॐऐंर्‍हींक्लीं बीज प्रणववधार । दत्तगुरू

Scanned with CamScanner

तीर्थक्षेत्र ।। ४०।। मंगलदास सिध्दकृपेनें । निंबोळीबीज प्रसेवने । दत्तांशबालानंद तेजानें । प्रगटदिव्य जगांत ।। ४१।। ॐ नमोभगवते दत्तात्रेयाय । ॐनमः शिवशक्ती मंत्रपर्याय । रामकृष्ण हरीमूळ अव्यय । जयजयकार गर्जति ।। ४२।। चैत्रशुक्ल पौर्णिमादिवस । स्वातीनक्षत्र सूर्योदयास । मीनलग्न वसंतऋतु समयास । बालानंद अवतार ।। ४३।। लग्नींसूर्य प्रभावान । कर्केचागुरू पंचमभुवन । लाभांत उच्चस्थ भौममहान । दैवीग्रह संपत्ती हे ।। ४४।। दैवीसंपदादायक ग्रहयोग । परमार्थ लोकादरसत्संग । जनतासेवा ध्येयप्रसंग । अपूर्वस्थिती सहज ।। ४५।। चैत्री पौर्णीमेची जयंती । स्मारक भजना पुण्यतिथी । उपासना पूर्ण विरक्ती । परंपरा सज्जन मार्ग ।। ४६।। जेष्ठशुक्ल पौर्णीमा । सहकृष्ण प्रतिपदा स्वधामा । समाधीधारणा प्रेमा । उत्सव दैवी कार्यार्थ ।। ४७।। एवं जेष्टकृष्ण प्रतिपदा । समाधी पर्व संपदा । ज्ञानेश्वर समान तत्पदा । दत्तपद निजधाम ।। ४८।। जयंती आणि पुण्यतिथी वारी । उत्सव व्हावेत सपरीवारी । भक्तजनां समवेत निर्धारी । पुजाअर्चा संतर्पणे ।। ४९।। अभिषेक भजनें गायन । दिंडयापताका नामचिंतन । वाद्यें मिरवणुकी अन्नदान । उदार मनें वर्तावे ।। ५०।। श्रीदत्तगुरू बालानंद परंपरा । अध्यात्म वेदांत आकारा । वारकरी प्रपंचपरमार्थ उध्दारा । वैदीक धर्म भागवत ।। ५१।। एवं विविध प्रकारें स्तुती । जनलोक नित्यनवी करती । स्तोत्रें प्रार्थना श्लोक रचिती । प्रेमभावे करोनि ।। ५२।। पूर्वी जैसे गाजले गाणगपूर । दत्तचमत्कारें साचार । श्रीनृसिंहसरस्वती अवतार । लोकोध्दार प्रगटले ।। ५३।। तें सायंदेव वंशजे श्रीगुरूचरित्र । त्रेपन्न अध्याय पवित्र । चमत्कार कथा विचित्र । आणि उपासना दत्ताची ।। ५४।। श्रीदत्त षोडश अवतार । साक्षात् ब्रह्माविष्णु महेश्वर । कल्पयोगी सर्वगामी दर्शनाऽ धार । स्मरणमात्रेचि संतुष्ट जे ।। ५५।। ज्ञानेश्वर एकनाथ । नृसिंहसरस्वती समर्थ । बालानंद दत्तपरमार्थ



अंशावतार दत्तरूप ।। ५६।। वेळोवेळी अवतार व्हावे । अलौलिक चरित्र प्रकटावे । भक्तांदीनां उध्दरावे ऐसी दैवीपरंपरा हे ।। ५७।। श्रीबालानंद दत्तगुरू चरित्र । प्रथम पांचअध्याय विष्णुदासकृत पवित्र । दोन अध्याय पंडित विष्णु कन्नडकरकृत । अठराशे शाहत्तर शकीं ।। ५८।। ऐसे हे सप्तअध्याय दत्तकथा कथन बालानंदगुरूचे वैराग्यदर्शन । सप्ताहपारायणा विधान । श्रीगुरूसिध्द दिव्यज्ञान ।। ५९।। जन्मचि व्हावया नवता । तो सावित्रीभाग्यें तत्वतां । सिध्द वैराग्यरूप प्रगटतां । साक्षात्कार गुरूज्ञानें ।। ६०।। सज्जनांची सद्गुणांची । परमार्थाची औदार्याची । भजनाची ब्रह्मानंदाची । परंपरा नित्यलाभतसे ।। ६१।। स्वधर्म सदाचार । परमार्थ उपासनासार । भक्तिश्रध्दा ज्ञानअपार । जगीं निरंतर वाढावया ।। ६२।। आदित्य परंपरा शुक्लयजुर्वेद । माध्यंदिन गोत्रयास्क याज्ञवल्क्यपद । बालानंद समाजींअभेद । चतुर्वेदी चतुर्वर्ग ।। ६३।। श्रीदत्त कृपा सदासदय । उदारता परकार्ये अक्षय । जनतोध्दार त्रिकाल निर्भय । मुक्तव्दार ज्ञानसत्र ।। ६४।। श्रीदत्त कपाटी माहुरस्थळी । जी जी सिध्दीकला लाभली । तियेचे उपयोग सर्वकाळी । मुक्तहस्ते करिताती ।। ६५।। दरिद्रीयांना धन । भ्यालेल्यांना अभयदान । वंध्यजना वंशसंतान । मुमुक्षुलोकां अध्यात्म ।। ६६।। एवं भारतांत प्रगटली कीर्ती । हरिभक्तां स्वधर्मी स्फूर्ती । जाणोंही दत्तमुर्ती । साक्षात् लोकीं प्रसिध्द प्रत्यक्ष ।। ६७।। त्या सोळाशे शतककाली । महाराष्ट्री यावनी धर्मसत्ता माजली । सर्वत्र हिंदुधर्म विनाशकली । अपरंपार भय वाढले ।। ६८।। ऐशावेळी हिंदुची संघटना । करवूनी प्रयत्न नाना । प्रेरणा स्वधर्म स्वराष्ट्र रक्षणकार्यांना भारतीयांना तयार केले ।। ६९।। शस्त्रास्त्रकला पराक्रम शौर्य । क्षात्रतेज ऐक्यवीर्य । धर्मकर्म संरक्षणीं धैर्य । उत्तेजिले उपदेशें ।। ७०।। यावनीय गुंडांची लाट उसळली । ती ती परतवून भंगियेली । ऐसी स्वातंत्र्यवृत्ती

Scanned with CamScanner

निर्माण केली । तत्कालीन संतांनी ।। ७१।। भजनानंद ज्ञानानंद । अर्चनानंद देवानंद । संतजनानंद प्रेमानंद कीर्तनानंद वाढविले ।। ७२।। जिकडे तिकडे हरि भक्ती । यावनावरी बैसविली दर्पोक्ती । औदार्यता विरक्ती प्रेममार्ग उंचावले ।। ७३।। योगमार्ग ज्ञानकला । प्रपंच परमार्थ जनतेला । मार्ग सुलभ केला । देशधर्मराष्ट्रो ध्दारा ।। ७४।। पुढे जनांच्या विनंतिवरून । बालानंदांनी प्रसन्न होऊन । स्त्रीपुत्र गोपालानंद नंदन । यांना जवळ आणविले ।। ७५।। आपण विरक्त व्रतस्थ उदास । परी भक्तांनी चालवावे आश्रमास । मठधाम भक्ती उपासनेस । औदार्याने कार्यक्रम ।। ७६।। ज्ञानेश्वरी भागवत । भजन प्रवचनसतत । संतर्पणे संतभक्तास । नित्य नवे ब्रह्मानंद ।। ७७।। मार्गशीर्ष दत्तजयंतीला । जावे वार्षीक माहुर गडाला । स्कंधी घेऊनी दत्तमुर्तीला । वारी करावी नियमाने ।। ७८।। आषाढांत पंढरपुर । संतमंडळासह भीमातीर । श्रीविठ्ठलवारी परिकर । चालवावी श्रध्देनें ।। ७९।। श्रीगोविंदबुवा अनासक्त । अमळनेरचे विरक्त । सखाराम भक्त । तिघांनी यात्रावारी करावी ।। ८०।। बालानंदांनी धर्मव्रतें आज्ञापिली । कीं ही व्दयवारी पाहिजे केली । भक्तिज्ञान वैराग्यकळा कथिली । वंशजांना कल्याणार्थ ।। ८१।। ग्रामजोशीपणा करूं नये । भ्रष्ट परान्न प्रतिग्रह घेऊ नये । याचना हीनपणा वरूं नये । लोभीपणा नसावा ।। ८२।। उपासना अर्चा दत्तसेवा । गायत्री पुरश्चरण मेळावा । संत वाङमय सद्‌भावा । निरंतर चालवावे ।। ८३।। अश्वत्थनिंब वटवृक्ष पुजन । अन्नदान संकीर्तन । गीता भागवत वाचन । नित्यनेम दत्तपुजा ।। ८४।। नित्य मागावी कोरान्नभिक्षा । हे दत्तसांप्रदाय दीक्षा । परमार्थ मुमुक्षु पक्षा । कर्तव्य ते करावे ।। ८५।। हीं व्रते जो चालवील । तो परमकल्याण पावेल । इहपर सौख्यां लाभेल । अयाचितपणे सौभाग्य ।। ८६।। ऐसी व्दयवारी चालली । ती बालानंद गोपालानंद भली । नारायण बुवा



पर्यंत तीनपिढया आली । नंतर राहिली सहज ।। ८७।। राहिले जरी पंढरपूर । परी वारी नेमें दत्तमाहूर । भागवत नाथसांप्रदाय संभार । श्रध्दा भक्तिपुर्वक ।। ८८।। जैसी ज्याभक्ताची भावना । तैसी अनुभवा येई कामना । श्रध्दा तैसे फल याजनां । प्रचीतीला येतसे ।। ८९।। श्रीमातापूर अंबासिध्ददत्त । कृपेनें सहावा अध्याय कथावृत्त । पंडितविष्णु श्रीदत्तगुरूचरित्र । श्रीदत्तचरणीं समर्पीतसें ।। ९०।। दत्तात्रेयार्पणमस्तु ।।

(श्रीबालानंद बंधकाव्य-श्लोक)

बालानंद धरी निवृत्ती पदरी योगक्रिया आदरी<br>
मातापुर गिरी भयंकर दरी तेथें तपा आचरी<br>
माया मोह हरी प्रपंच न करी श्रीदत्त भक्ती वरी<br>
वैराग्यार्थ शिरी कृतार्थ विवरी सद्‌भावना अंतरी ।। १।।

स्तोत्र श्लोक

बालानंद परात्म सिध्द वरदी श्रीदत्त भक्तीवरी<br>
ज्ञानी वारकरी सु-भागवत हे योगार्क मातापुरी<br>
साक्षात्कार परंपरां प्रकटली गोपाल धी वंदन<br>
श्रीनारायण बालकुष्ण चरणीं साष्टांग हे वंदन ।। १।।

(श्रीबालानंद मंगलाष्टक-श्लोक)

बालानंदगुरू स्वरूप हरिचें भक्तार्थ आकारलें<br>
दीनां कल्पतरू श्रुतिस्मृति पथें आचार संपादिले<br>
भक्तिज्ञान विराग भागवत जो साक्षात् जनां मंगल<br>
श्री विज्ञानकला विलास विलसे, कुर्यात् सदा मंगलं ।। २।।

अनुष्टुप श्लोक

दत्तरूप महायोगी बालानंद गुरूः शिव<br>
गोपालानंद भाग्य श्री नारायण परंपरा १<br>
सिहाद्री पर्वतानंद दत्तानंद भवापह<br>
ज्ञानी वारकरी साक्षात् ज्ञानेश्वर नमोस्तुते २

श्रीब्रह्मचारी गति बालरूप । गृहस्थ संसार पथ-स्वरूप ।।<br>
योगी विरक्त श्रृति देव-भक्त । वेदांत आनंद सदा विभुक्त

Scanned with CamScanner

# ।। श्रीबालानंद चरित्र-अध्याय ७ वा ।।

।। ॐ श्रीमद्गणेशांबा नाथ गुरूदत्त बालानंद चिदानंदेभ्यो नमोनमः

श्रीसंत विष्णुदासकवी माहूरकरकृत । श्रीगुरू बालानंदचरित्र पंचअध्यायांत । शके अठराशेचवदा शकांत प्रासादिक पुण्यकाव्य ।। १।। तदनंतर शकेअठराशे शहात्तरांत । पुढील दोनअध्याय पंडितविष्णु कन्नडकर विरचित । ऐसे हे सप्तअध्याय बालानंद चरीत्र । सप्ताहपरायण साक्षात्कार ।। २।। सातवे अध्यायांत अक्षर बंधात्मक । गायत्री सावित्री व्याऱ्हति मंत्रसम्यक । वेदांतबीज अध्यात्म अलोलिक । प्रसादभाग्य भक्तजना ।। ३।। जे जे संतकवी भक्त जहाले । तयांच्या वचना पाहिजे अनुभविले । अशक्य कार्येही ज्ञान भक्तीबळें । कल्पतरू भाविकां ।। ४।। ॐनमः परमहंस गुरूनाथाय । स्मरणमात्र संतुष्ट दत्रात्रेयाय। मूलाधार अमृतषोडष पद्मदलाय । स्वाधिष्टान ब्रह्मपद ।। ५।। जें मन पवननीळ अनुहद चक्रावरी । ऱ्हीं सहस्त्रार कर्णिका साजिरी क्लीं अहंब्रह्म चैतन्य ज्ञानमुद्रा प्रकारी । त्रिगुणेश्वर दर्शन ।। ६।। विष्णुदासकवी संतबालानंद । यां लाभले परब्रह्मानंद । उपासकां कैवल्य साम्राज्यानंद । भक्तीज्ञान वैराग्य ।। ७।। ॐऐं श्रीं भूः षोडशावतार दत्त । ऱ्हीं गुरूअवतार बालानंद अव्यक्त । क्लीं दत्तसगुण ब्रह्मोस्मि ।। ८।। आद्य शंकराचार्य दत्त परंपरा उपदेश ज्ञानेश्वर बालानंद अविनाश । सहस्त्रदल कमलपत्र प्रकाश । ज्ञानसमाधी अखंड ।। ९।। ऐं ऱ्हीं क्लीं बीजसंपुट वैदीक पौराण गुरूमंत्र मोक्षपट । विठ्ठल शिवहरी गुरूविराट । ज्ञानजपमाळा उपदेश ।। १०।। परम श्री ऐश्वर्य संपन्न बालानंदगुरू । वैराग्य औदार्य धर्ममेरू । मंगल दर्शन श्रध्दाकल्पतरू । निजजनां मंत्रगुह्म देते झाले ।। ११।। ॐश्रीदत्त त्रिगुण वेदरूपाय । सिध्दावतार षोडष तंत्राय । विज्ञान बाल चिदानंदाकाशाय । प्रणव



तत्वाय ते नमः ।। १२।। पद्मकला चतुर्दल शिवशक्ती ब्रह्माय । पांडुरंग रूक्मिणी वराय । कैवल्यानंद चैतन्य कलाय । हरिहराय गुरवेनमः ।। १३।। मोक्षप्रद ॐनमोभगवते वासुदेवाय । रामकृष्ण हरि शंकराय । श्री दत्तगुरू पद्मासनाय । ऱ्हीं आदिनाथ योगेश्वरायनमः ।। १४।। ज्ञानमेरू ज्ञानेश एकनाथ समर्थाय । निळोबा तुका श्रीधराय । कल्पासन कल्पयोगी कल्परूपाय । कल्पना परमेष्टिने नमः ।। १५।। आत्मधाम निष्काम परंज्योति विश्रामाय । उपनिषद पुराणरूपाय । ॐनमस्ते गायत्री सावित्री पराय । ज्ञानप्रकाश आदित्यास नमः ।। १६।। ऐं ऱ्हीं क्लीं ॐकार दिव्य भूर्भुवःस्वराय । स्वानंद विज्ञानाय वराय । परात्म भूः आनदमानंद कराय भव्याय । भगवत्तेज नमस्ते ।। १७।। त्रिसर्ग भुरादि सरस्वतीवीणा काव्याय । जगत् व्यापकाय । ॐभूर्भुस्वः व्याऱ्हती प्रकृतिपुरूष रूपाय । नमः सृष्टीकर्त्रे ।। १८।। नृसिंह नलशक्ती राधाकृष्णाय । भक्तविज कारूण्याय । श्रीं सॅनमःमोक्षकल्याण तत्वमसि महावाक्याय । नमस्ते ।। १९।। अध्यात्म स्वर्लोक ब्रह्मेंद्र वैकुंठ मुक्तिपरंधामाय । लक्ष्मी मयाय । वाङमय क्लीं आत्मरूप निर्वाण तेजरूपाय । नमस्ते ।। २०।। वैदीक वर्णाश्रम धर्म आचार । नित्यकर्म सदाचार । त्यानंतर उपासना यात्रा वारीविचार । परंपरा धर्म कर्मयोग ।। २१।। भागवत वारकरी असले । तरी प्रथम नित्यकर्माचार पाहिजे केले । संतज्ञानी यांनी कथिले । भक्तिज्ञान वैराग्यकर्म ।। २२।। आचमन चोवीसनांवे प्राणायाम । सूर्यअर्घ्ये गायत्री जपनियमन । पुजा उपासना निष्काम ब्रह्मकर्म भजनादी ।। २३।। पंचमहायज्ञ समाराधन । वेद संतवाङमय गायत्री पुरश्चरण । साधुभक्त समागम संतसेवन । देवदर्शन प्रपंचात ।। २४।। स्मरण हरी संकीर्तन । परोपकार पुण्यदान । अध्यात्म ग्रंथ विवेचन । औदार्य प्रेम उदारता ।। २५।। संतसाधु ब्राहाणभक्त । आशातृष्णा लौकिकत्यक्त । विश्वप्रेम आसक्त । ऐसी

Scanned with CamScanner

वृत्ती असावी ।। २६ ।। सोळाशे शकारंभात । अवतार बालानंद होत । तेव्हां आणिकही संतमहंत । धर्मरक्षणा फिरती ।। २७ ।। पंचवीस वयोवर्षे सुमारास । घरी एकपुत्र जन्मल्यास । प्रपंची होउनि उदास । ईश्वर शोधा निघोनि गेले ।। २८ ।। माहुर गडावरी श्रीदत्त । सिध्दस्थान अवधुत । तेथे श्रीदत्त कृपाइच्छित । अनुष्टान पूर्ण केले ।। २९ ।। फलपुष्प उदक आहार । जपतप वैराग्य आचार । पाहुनि निष्ठा उदार । दत्त येती दर्शनाला ।। ३० ।। ज्ञानयोग सिध्दी मिळाली । श्रध्दा सत्यवाचा प्रगटली । रिध्दीसिध्दी उभी राहिली । त्रिकाल ज्ञान विज्ञान ।। ३१ ।। लोकोपकार धर्म परिचर्या । राष्ट्रदेश जनता कार्या । सज्जनवृंद सत्कार्या । दर्शने देत संचार करिती ।। ३२ ।। राष्ट्रदेश धर्मरक्षणा लोक धांवले । सकल लोक एकत्र केले । परधर्म भयापासूनि वांचविले । भारतीय जन ।। ३३ ।। भक्तिमार्ग विस्तारिले । वारीच्या निमितें लोकसावध केले । आपण त्याग व्रत स्वीकारले । उपदेश स्वातंत्र्यार्थ ।। ३४ ।। जन्मग्रह कुंडलीफलें मिळावी । म्हणुनी गायत्रीपुरश्चरणे करावी ' सूर्योआत्मा ' ही श्रुति बरवी । भागयोदय गायत्रीनें ।। ३५ ।। दूधग्रामी मठ देवस्थान । यात्रापर्यटणे तेथून । प्रपंच निरपेक्ष राहुन । बालानंद ब्रह्मानंद करी ।। ३६ ।। माहूरगढ दत्तसिध्दवारी । पंढरपुर विठ्ठलवारी शिवरात्री शंकरवारी । जनतोध्दरणा ।। ३७ ।। बालानंद गोपालानंद । नंतर नारायणानंद । त्रैमूर्ती त्रय पिढया वारी । अव्याहत चाललीसे ।। ३८ ।। दत्तमाहूर पंढरपुर । वारी चालतां सपरीवार । पुढे केवळ दत्तजयंती प्रचार । एकचि वारी चाललीसे ।। ३९ ।। सपरीवार सवाहन यात्रा चालावी । जनतेने सोय करावी । नित्यसंतर्पणे पूजा व्हावी । धनवस्त्रान्नपूर्ण वारी ।। ४० ।। श्रीदत्त जयंती उत्सव । गुरुभक्तीचे वैभव माहुरक्षेत्री अभिनव । सन्मान थाट रहातसे ।। ४१ ।। दोन शतक कालावधीत । ही वारी यात्रा चालत ।



विष्णुदासकवी नारायणबुवा संगतीत । माहूरदर्शन निवास होतसे ।। ४२ ।। त्यानंतरेही माहूर यात्रा । परि श्रमें चाले सर्वत्रा । येतां कालगती विचित्रा । श्रध्दायात्रा प्रमाण कमीहोत ।। ४३ ।। बालकृष्ण रामकृष्ण चौथे पुरुष । तयांनालाभे अल्पायुष । पुढे भक्तिपरंपरा वारीविशेष । कालगतीने चाललीसे ।। ४४ ।। एकपुत्र बालकृष्णाला । पूजा मठादि परंपरेला । रघुनाथबुवा चालविती वारीला । दत्तमाहूर जयंती यात्रा ।। ४५ ।। वारी बारावर्षे सांभाळीली । ती आतां गोरक्षनाथे चालविली । परिश्रम फार यात्रेला । परी परंपरा रक्षण ध्येय ।। ४६ ।। आलीकडे वारीयात्रा माहुरला । होतसे दत्तयंतीला । परंतु लोकांच्या श्रध्दा भक्तीला । अंतर फार पडलेसे ।। ४७ ।। तथापि बालानंद संतआज्ञा । प्रमाण पाळीजे सर्वप्राज्ञा । श्रीदत्त परंपरा सूज्ञां कल्याण परमार्थ ।। ४८ ।। पूर्वजन्मकर्म योगांनी । आकर्षिले दत्तआज्ञेनीं । म्हणुनी दूधग्रामाहुनी । रघुनाथबुवा निघाले ।। ४९ ।। चाळीसगांव दैवी पाटणा परीसरांत । श्रीमान् पाटसकरांच्या दत्तमंदिरांत । दत्तसेवाकर्मे अयाचित । वास्तव्य जहाले दत्तकृपें ।। ५० ।। शके अठराशेसाठ संवत्सर । पासुनि दत्तसानिध्य सपरीवार प्रपंच परमार्थ कार्ये उदार । संतवाङ्मय परिचर्या ।। ५१ ।। श्रीहरिभाऊ पाटसकर उदारतेनें । येथे वास्तव्य होतसे प्रेमाने । दत्तउपासना शुध्दमनें । होतसे नित्यस्वानंदे ।। ५२ ।। दूधग्रामातुनि इकडे आले । परि रघुनाथ बुवांनि राखून ठेविले । वारीचे समाधीवे वृत्तीचे हक्क सगळे । स्वतःकडे पूर्ववत ।। ५३ ।। वडीलपणाचे हक्क राखोनी । इकडेही वास्तव्य इच्छानुसारांनी । बालानंदांची वृत्तीजुनी । पूर्वापार संपादन ।। ५४ ।। राष्ट्रात देशात शूरवीर । निपजावेत उदार । परशुराम द्रोण सम खंबीर । शापादपि शरादपि ।। ५५ ।। देशराष्ट्र धर्मसंत वाङ्मय कार्ये । यज्ञब्राह्मण शौर्य वीर्यें । अवतार विश्वास धर्मे आर्य । अनेक संघ असावेत ।। ५६ ।। भगवदभक्ती

Scanned with CamScanner

ज्ञानभक्ती । श्रध्दाभक्ती देवताभक्ती । वैदीक कर्मकांड भागवतभक्ती । नवधाभक्ती असावी ।। ५७।। श्रीमद्‌भागवत ज्ञानेश्वरी । गीता उपनिषद वैखरी । वेदवेदांत शतपथ पुराणोत्तरी । प्रस्थान त्रयी आचार्य ।। ५८।। ही ब्रह्मसंत कर्मे सकळा । आचरिली बालानंदे निर्मल । सकाम निष्काम यज्ञफल । श्रीदत्त पांडुरंगीं अर्पिली ।। ५९।। नाम जपमंत्र कर्म ब्रह्मयज्ञ । श्रीहरिसंकीर्तन मनोजय यज्ञ । खाहास्वाहा अध्यात्म यज्ञ । व्दादश यज्ञ आराधिले ।। ६०।। नामकीर्तन सप्ताह । पुराणभागवत सप्ताह । वेदभजन सप्ताह । अन्नदान सप्ताह ।। ६१।। बालानंदा पासून । संप्रति पाचवेपुरूष नंदन । रघुनाथबुवा चाळीसगांवी राहुन । दत्तपरंपरा चालवितात ।। ६२।। गोरक्षनाथ हे त्यांचे बंधु । असती धाकुटे चुलत संबंधू । दुधग्रामी ऋणानुबंधु । देवस्थान सांभाळिती ।। ६३।। मठमंडप पादुका अर्चन । प्रपंच परमार्थ चिंतन । दत्तवारी भजनपुजन । गोरक्षनाथ चालवितात ।। ६४।। द्रव्यबल मनुष्यबल । विषेपसे सम्पत्तीबल । स्थाईक इस्टेटबल । पूर्वी पासुन कांहींच नाहीं ।। ६५।। मंगलदासा पासुन । प्रस्तुत सातवे गुरूवंशवन । पुढें गायत्रीपुरश्चरण घडेल जरीअर्चन । तरी परंपरा चालेल ।। ६६।। वंशधन ऐश्वर्य वृध्दी । संतती भाग्य ज्ञानवृध्दी । कुलसमाधान वृध्दी । व्हावया सदा चार नेमिले ।। ६७।। सात पुरूषानंतर । वारी यात्रावृध्दीमध्यें महदंतर । कठीणता होउनि तमघोर । अनुभवा येतील अनाचारें ।। ६८।। मठ पादुका पूजा वारी । दत्तभक्ती अव्यभिचारी । जरी चालेल निरंतरी । पुण्योदय होईल कीं ।। ६९।। ऐसे भविष्य बालानंदाचे । हे मानावे विश्वासाचे । पूर्वाचारे भाग्य कल्याणाचे पर्व उदय पावेल ।। ७०।। वडपिंपळ निंबवृक्षारोपण । त्यांचे नित्यअर्चन । श्रीदत्त नैष्टिक उपासन । उत्कृष्ट पणें असावे ।। ७१।। श्रीबालानंद कल्पतरू विस्तारला । निष्ठासम पावे भजकाला । तो सिध्दर्शन त्रिकाला



समाधीत प्रत्यक्ष ।। ७२।। शके अठराशेचौदा शकांत । माहूरक्षेत्री विष्णुदासकवी रचीत । हे बालानंद गुरू चरित । पांचअध्याय प्रथमचे ।। ७३।। त्यानंतर घुष्णेश्वर देवगिरी कनकावती । निवासी पंडित विष्णु अल्पमती । दत्तमंदिर चाळीसगांवामति । असतां रचीत अध्याय व्दय ।। ७४।। शके अठराशे शहात्तरकाली । ही रचना फळाआली । एवं सप्तअध्याय विस्तारली । बालानंद अमृतलता ।। ७५।। बालानंद दत्तगुरु महिमान श्रीदत्त याग्रंथी विराजमान । चतुर्विध पुरूषार्थ साधन चरित्रकांड पठनमात्रें ।। ७६।। श्रीदत्तपादुका मुर्ती ठेवोनी धुपदीप त्याभोवर्ती । फळेपुष्पें उपहार नैवेद्य शुध्दमती । पारायण करावें ।। ७७।। नित्य एकएक अध्याय । मंत्रजपपूजा निरामय । प्रदक्षिणा उपवास आनंदमय । औदार्य दान दत्तभक्ती ।। ७८।। माहुरगडचे सिध्दगुरूदत्त । स्थाईक स्थल मंदिराचे त्रिमुर्तीदत्त । षोडश अवतारांचे ब्रह्माविष्णुदत्त । हे सर्व ऐक्यरूप ॐकार ।। ७९।। विद्या विज्ञानकला । धनधान्य ऐश्वर्याला । संतान प्रपंचसुखाला । सर्वार्थीला पावतील जन ।। ८०।। श्रीगुरूचरीत्र त्रेपन्न अध्यायांचे । षोडशवतार दत्तचरित्र सोळा अध्यायांचे । हे दत्तगुरूचरित्र सात अध्यायांचे । त्रय चरित्रें दत्तमय ।। ८१।। हे बालानंद चरित्र । एकाच दिवसांत पारायण पवित्र । रूद्राभिषेक सहस्त्रनाम पाठविचित्र । उपासना एकांती ।। ८२।। दत्तगुरू बालानंद चरीत्रपारायण । श्रध्दाशांती औदार्य परायण । श्रीचरणीं उपचार समर्पण । इच्छाभावना पुर्ण होतील ।। ८३।। श्रीसिध्द दत्तगुरू त्रैमुर्तीला । षोडशावतार अंबाकाली मातेला । सिंव्हाद्री रेणुका माहूरगडाला । याज्ञवल्क्य योगेश्वग ।। ८४।। ज्ञानेश्वर एका जनार्दनाला । भागवत वारकरी पंथाला । वेदोपनिषद भारतभूला । राजर्षी भक्त संतजना ।। ८५।। देवगिरी घृष्णेश्वर । सह्याद्री पाटणा देवीउदार । चाळीसगांव संतदेव परंपरासार । बालानंद दत्तगुरू रूप ।। ८६।।

Scanned with CamScanner

मंगलदास दूधग्राम । समाधी पादुका मठधाम । संतमहात्म रामकृष्ण विठ्ठलप्रेम । तर्थक्षेत्रे विष्णुदास कवी ।। ८७।। कन्नड निवासी संतकिंकर । विष्णु बाळकृष्ण श्रध्दा उदार । साष्टांग नमितसकलां श्रेयस्कर । आशीर्वाद पुण्यकाम ।। ८८।। श्रगुरूदत्त बालानंद भक्त व्हावे । श्रीगुरू संतचरित्र पठण करावे । अक्षय श्रीफला लाभावे । ब्रह्मवर्चस्व जन्मोजन्मी ।। ८९।। श्रीरघुनाथबुवा संतपरंपरा पुरूष । तयांनी प्रेरणा केली विशेष । सप्ताह साक्षात्कार सप्तअध्याय निर्दो ष । श्रीगुरूचरीत्र कथा ।। ९०।। सप्तपाताल सप्तलोक । सप्तजन्म सप्त वेदांत विवेक । सप्तर्षी सप्तमन्वंतरे सप्तपुरी निःशंक । तैसे सप्त अध्याय हे ।। ९१।। जयजय श्रीमंगल दत्त । सप्त अध्याय हे पुण्य चरित । श्रीविष्णुपदी समर्पित । कल्याण श्रीतत्सत् नमः ।। ९२।।या दत्तमहात्म्याची फलश्रुति । जैसी श्रीदत्त महापुर्णार्ती । स्वहस्ते जो लिहिल आवृत्ती । पुनरावृत्ती त्यास नाही ।। ९३।। प्रथम पांच अध्याय लेखन । पावणे तीनशतक ओवी विरचन । विष्णुदास कवी कृत गणना । दत्त कथा सुत्रमय ।। ९४।। उत्तरार्धाचे दोन अध्याय । पंडित विष्णु कन्नडकरकृत निरामय । तयांच्या दोन शतक ओव्या पद्यमय । एवं पाऊण पांच शत पद्यसंख्या ।। ९५।। हे सप्त अमृत मंत्र समुद्र उंचबळले । हे सप्त कल्पतरू उद्याने फळले । सप्तसप्ताह पुण्य मेघ मिळाले । व्रत दर्शन साक्षात् होय ।। ९६।। माहुरचे विष्णुदास कवी कल्पतरू पुष्पहार । कन्नडचे विष्णु संतपद विहार । परंतु नाम साद्दश्येंचि जन्मोध्दार । मंदारमाला बंधासम ।। ९७।। बालानंद सिध्ददत्तरूप । देवभक्त प्रभादीप । व्दय विष्णुंचे ओघ एक आप । नमस्ते भगवन् साष्टांग ।। ९८।। देव वेद धर्म आचार भ्रष्ट । ब्राह्मणादि जाती होतात नष्ट । हा लोकराज्य समता भास निकृष्ट । निरसूनी प्रगटो सत्य दिव्यधर्म ।। ९९।। नंदन वनपुष्प सुधावर्ष । भक्त कथावगाहन धर्माचार हर्ष



भक्तिज्ञान वैराग्य उत्कर्ष । प्रकर्षे होवो परमार्थ ।। १००।। चिदाकाशतूनी वर्षो स्वगंगा । विष्णु कवींनी वळविलेली अघौघ भंगा । त्रितापहरा इष्टफला सत्संग । भारत कल्याण अभंगा नमोस्तु ।। १०१।।

श्रीगुरू ज्ञान परंपरा अभंग–

मंगल दासांचे । दिव्य वरदान । रघुनाथ ज्ञान । सावित्री श्री ।। १।।
बालानंद पूर्ण । दत्त अवतारी । भक्त साक्षात्कारी । सिध्द संत ।। २।।
गोपाला नंदाला । हरि कीर्तनाला । नारायण झाला । भक्त सूत ।। ३।।
नारायण त्याचे । श्रीदत्त वारीचे । संत अंश साचे । भक्ती मार्गी ।। ४।।
विष्णुदास कवी । श्रीगुरू चरित्र । संतजन चित्र । नमस्कारी ।। ५।।

श्रीगुरू प्रणाम श्लोक


बालाद्यनंदाख्य पदारविंदं । प्रभा कृपायां स्तवने प्रबंधे ।
भक्तार्थ लोकेषु उदारतास्ते । श्रेयस्करायार्थ नमो नमस्ते ।। १।।


श्रीगुरू ज्ञान परंपरा श्लोक

श्रीमान् मंगलदास दत्तवदी दुग्ध प्रभूलागि दे ।
भक्त श्रीरघुनाथ सत्वगुण धी सावित्री मंत्रा वदे ।।
बालानंद सुधात्म विश्व विजयी गोपाल भू नंदन ।
श्री नारायण बालकृष्ण चरणीं साष्टांग हें वंदन ।। १।।

Scanned with CamScanner

# श्रीगुरू (वंश) परंपरा वृक्ष.






Scanned with CamScanner

# ।। आरती बाळानंद महाराज ।।

आरती बाळानंदा । सत् चित सुखकंदा । धृ ।
वांछित मकरंदा । मनपदार विंदा ।। आरती बाळानंदा ।।

अवधुत अवतारा । सदगुरू दातारा
प्रपंच घर धंदा । दुरकरी भव बंधा ।। १ ।। आरती–


उन्मनी गुरू राजा । करी मानस पुजा
धुपदिप सुगंधा । पद आरती छंदा ।। २ ।। आरती–

बहुळातिर वासा । उध्दरी विष्णुदासा
प्रसन्न मुख सदा । शुभमंगल वरदा ।। ३ ।। आरती–

घालीन लोटागण वंदीन चरण डोळयान पाहिन रूप तुझे
प्रेमे अलिंगीन अनंतपुजेन भावे ओवाळीन म्हणे नामा

Scanned with CamScanner

प.पू.समर्थ सद्गुरु श्री बाळानंद स्वामी महाराज यांची समाधी–दुसखेड



Scanned with CamScanner